# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.02.2025** **वार:शनिवार**

1. 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन
2. मराठी साहित्य संमेलन केवळ महाराष्ट्राचाच नाही तर देशाचाही सांस्कृतिक ठेवा असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार
3. भाषा ही जोडणारी असावी, तोडणारी नाही-संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांचं प्रतिपादन
4. केंद्रिय मंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचं वितरण करणार आणि
5. विदर्भ आणि केरळचा संघ रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**साहित्य संमेलन**

भाषा केवळ संवादाचं माध्यम नसून ती संस्कृतीची संवाहक असते; मराठी भाषेने महाराष्ट्रातीलच नव्हे देशातील अनेक महापुरूषांच्या विचारांना अभिव्यक्ती देऊन सांस्कृतिक निर्माणाचं महान कार्य केलं आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

मराठी साहित्य संमेलन केवळ एक भाषा किंवा एका राज्यापुरतं सीमित नाही तर त्यात स्वातंत्र्यलढ्याचा गंध आहे, तो महाराष्ट्राचा आणि देशाचाही सांस्कृतिक ठेवा आहे असं पंतप्रधान म्हणाले. मराठी भाषेच्या माध्यमातून भक्तीमार्गाची चळवळ उभी करुन महाराष्ट्रातल्या संतांनी समाजाला नवी दिशा दिली असं सांगून पंतप्रधान म्हणाले......

**देशाच्या आर्थिक राजधानीच्या, राज्यातून देशाच्या, राजधानीत आलेल्या सर्व मराठी, सारस्वतांन्ना माझा नमस्कार। ज्ञानबा-तुकारामांच्या मराठीला आज राजधानी दिल्ली अतिशय मनापासून अभिवादन करते। आणि आज तर जागतिक मातृभाषा दिवस आहे. तुम्ही दिल्लीतील साहित्य सम्मेलनासाठी दिवस सुद्धा अतिशय चांगला निवडला। मैं जब मराठी के बारे में सोचता हूं, तो मुझे संत ज्ञानेश्वर का वचन याद आना बहुत स्वाभाविक है। 'माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके। यानी मराठी भाषा अमृत से भी बढ़कर मीठी है। मैं आप विद्वानों की तरह मराठी में उतना प्रवीण तो नहीं हूं, लेकिन मराठी बोलने का प्रयास, मराठी के नए शब्दों को सीखने की कोशिश मैंने निरंतर की है।**

साहित्य संमेलनाच्या या उद्घाटन सोहोळ्याला स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

भाषा हे संस्कृतीचं बलस्थान आहे. भाषा ही जोडणारी गोष्ट असायला पाहिजे, तोडणारी नाही असं संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर विज्ञान भवनात झालेल्या उद्घाटन सोहोळ्यात म्हणाल्या. बोली भाषेतून मराठी समाजात पसरलेली, ही जैविक भाषा आहे असं म्हणत भवाळकर यांनी मराठीचं वेगळेपण विशद केलं....

**भाषा ही प्रत्यक्ष जीवनात असावी लागते, कारण भाषा ही एक जैविक अशी गोष्ट जिवंत, जर भाषा बोलली तर ती जिवंत राहते नुसती पुस्तातनं आणि ग्रंथात जिवंत राहत नाही, म्हणून भाषा ही जैविक आहे आणि महाराष्ट्राला सातत्याने पांडुरंगाचा स्मरण मराठीतनं करायला लावणारी ही भाषा संतांनी जिवंत ठेवली आमच्या, आणि आमच्या या संतांच्यामध्ये मुद्दाम आवर्जून सांगते, ते मराठी साहित्याचा उगम कुठे झाला अमुक साली शाळा निघाली आणि माणसे शिकायला लागली हे आमचं आधुनिक पांडित्य झालं. ज्यादिवशी आईने पहिली ओवी आपल्या बाळाला म्हटली असेल त्या दिवशी मराठी भाषा आली. कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी, लसूण मिरची कोथिंबिरी अवघा झाला माझा हरी। एक असं म्हणणार आमचा सावता माळी त्यांनी हि भाषा जिवंत ठेवलेली आहे. फार कशाला जनाबाई, मुक्ताबाई तर आपल्याला माहितीच आहेत. विठ्ठलाला आणि जनाबाई बरोबर दळायला लागला, कांडायला लागला, पाणी भरायला लागला, जनी बैसली न्हायाला पाणी नाही सणाला मुद्दाम बोलीभाषेत सांगते जनी बैसली न्हायाला पाणी नाही सणाला हाती घेऊन घागरी देवा निघाले तातडी। जनाबाईला आंघोळ घालायला, ही आमची मराठी भाषा आणि या मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला या सगळ्यांना मिळून हे अभिजातपण आलेलं आहे.**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलं संमेलन दिल्लीत होत आहे ही अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याप्रसंगी म्हणाले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

**<u>दुसरे सत्र</u>**

या साहित्य संमेलनाचं उद्घाटन दोन सत्रांत झालं. तालकटोरा मैदानात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत झालेल्या उद्घाटन सोहोळ्याच्या दुसऱ्या सत्राला माजी केंद्रिय मंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्यासह संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर आणि मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे उपस्थित होते. यावेळी डॉ. रवींद्र शोभणे यांनी अध्यक्षपदाची सूत्र डॉक्टर तारा भवाळकर यांच्याकडे सुपूर्द केली. नूतन अध्यक्षांकडे सूत्र सोपवितांना कृतार्थतेची भावना असल्याचं शोभणे यांनी नमूद केलं.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ही अभिमानास्पद बाब असून मराठीचा वापर सर्व स्तरांत, सर्वदूर वाढला पाहिजे, असं प्रतिपादन डॉ. तारा भवाळकर यांनी यावेळी केलं. प्रमाण लेखनाइतकीच बोलीभाषाही महत्वाची आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांच्या भाषेला सामावून घेतलं तरच आपली भाषा अधिकाधिक समृद्ध होईल, असं त्या म्हणाल्या. मराठी भाषेचा विस्तार होण्यासाठी सर्वांनी कृतीशील होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उद्घाटन सोहोळ्यापूर्वी काल सकाळी भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. मराठमोळ्या वेशभूषेतील हजारो मराठीजनांचा यात सहभाग होता.

**<u>अमित शहा-जयकुमार गोरे</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर येत असून गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची 27 वी बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यांसह दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, प्रशासक, वरिष्ठ मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यात अमित शहा जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभालाही उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अमित शहा यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण करण्यात येणार आहेत. राज्यातल्या 10 लाख लाभार्थ्यांना या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरणदेखील यावेळी करण्यात येईल. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी काल पुण्यात पत्रकार परिषेदत याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**उपराष्ट्रपती-संभाजीनगर**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 65व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या चार इमारतींचं भूमिपूजन, आणि संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त सरस्वती भुवन शैक्षणिक संस्थेत आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत. आपल्या या दौऱ्यात ते, वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिरालाही भेट देणार आहेत.

**रणजी क्रिकेट**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळनं अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. नागपुरात झालेल्या उपांत्य सामन्यात विदर्भानं मुंबईवर 80 धावांनी विजय मिळवून अंतिम फेरी गाठली.

अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात झालेला उपांत्य सामना काल शेवटच्या दिवशी अनिर्णित राहिला. मात्र पहिल्या डावातल्या आघाडीच्या जोरावर केरळनं अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं. अंतिम फेरीचा सामना 26 फेब्रुवारीला सुरू होईल.

**हवामान**

हवामान - राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
## नमस्कार.